# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२ | पेपर कात्रण | दिनांक :- ०६/१२/२०२२

------------------oooooo-------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ०६/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

२)

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०६/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. ३ | भोंदुबाबा अटकेत | तुळींज | |
| २. | ०६/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. ३ | विरार येथे ७० लाखांचे अंबरग्रीस हस्तगत | नालासोपारा | |
| ३. | ०६/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. ३ | पोलीस ठाण्यातुन फरार आरोपी अटकेत | मांडवी | |
| ४. | ०६/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | वसईत १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी ५२७ उमेदवारी अर्ज | वसई विरार | |
| ५. | ०६/१२/२०२२ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | पालघर जिल्ह्याच्या पारपत्र कार्यालयाचे आज उद्घाटन | वसई | |
| ६. | ०६/१२/२०२२ | पुण्यनगरी पु. पान क्र. १ | चोरट्याला मारहाण करणाऱ्यांना अटक | पेल्हार | |
| ७. | ०६/१२/२०२२ | पुढारी पान क्र. ५ | जंजिरे धारावी किल्ल्यात नशेबाजांची धरपकड | उत्तन | |
| ८. | ०६/१२/२०२२ | पुढारी पान क्र. ५ | लॉजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय | नवघर | |
| ९. | ०६/१२/२०२२ | पुढारी पान क्र. २ | महाविकास आघाडीचा १७ डिसेंबरला मुंबईत मोर्चा | इतर | |
| १०. | ०६/१२/२०२२ | लोकमत पु. पान क्र. ४ | एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणुक | नवघर | |

CS CamScanner

1) लोकसत्ता पृ. पान क्र. 3

दि. 06/12/2022

# भोंदूबाबा अटकेत

## उपचार करण्यासाठी मंतरलेल्या तेलाचा बनाव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार** : नालासोपारा तुळींज पोलिसांनी प्रार्थनेच्या नावाखाली उपचार करणाऱ्या एका इसमाला अटक केली आहे. त्याच्याकडून पोलिसांनी एक मोबाइल जप्त केला असून त्यात उपचार केल्याच्या अनेक चित्रफीत आहेत. पोलीस त्यांची तपासणी करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नालासोपारा पूर्वेच्या नगीनदास पाडा परिसरात राहणाऱ्या सदानंद तेली या इसमाने एका गाळ्यात प्रार्थना केंद्र सुरू केले होते. त्यात त्याला दैव्य शक्ती प्राप्त असून तो चमत्काराच्या सहायाने लोकांचे उपचार करण्यासाठी त्यांना अंगावर लावण्यासाठी आशीर्वाद तेल देत त्यांच्याकडून पैसे घेत होता. त्यांना येशूच्या नावाचा जप करण्यासाठी सांगत असे 'जल का झरना' नावाने त्याने हे केंद्र जुलै २०२२ मध्ये सुरू केले होते. त्याच्याकडे पोलीस कारवाईसाठी गेले असता ४० ते ५० लोक उपस्थित असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्याम आपेट यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन जादूटोणा प्रतिबंध कायदाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या केंद्रासाठी त्याने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे त्यांनी सांगितले. आरोपीने पंजाबमध्ये जाऊन सिद्धी प्राप्त केल्याचे सांगितले. आपेट यांनी माहिती दिली की, आरोपी तेली हा १०वी इयत्तेत दोन वेळा नापास झाला असून त्याने सदानंद तेली मीनिस्ट्री नावाचे यूट्यूब चॅनलसुद्धा काढले आहे. पोलीस सर्व प्रकरणाचा तपास केल्याचे त्यांनी सांगितले.

2) लोकसत्ता पृ. पान क्र. 3

# विरार येथे ७० लाखांचे 'अंबरग्रीस' हस्तगत

## गुन्हे शाखेकडून चार जणांना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार** : येथे देवमाशाची उलटी विकण्यासाठी आलेल्या चार जणांना गुन्हे शाखा कक्ष ३ ने रविवारी अटक केली आहे. यांच्याकडून ७० लाख रुपयांचे 'अंबरग्रीस' (देवमाशाची उलटी) जप्त करण्यात आले.

देव माशाच्या 'अंबरग्रीस'चा उपयोग सुगंधी द्रव्ये आणि औषधात केला जात असल्याने काळ्या बाजारात या उलटीला मोठ्या प्रमाणात किंमत आहे. यामुळे याची तस्करी केली जाते. नालासोपारा येथे काही इसम देव माशाचे 'अंबरग्रीस' विकण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा ३ च्या पथकाला मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी सापळा नालासोपारा येथिल हॉटिल रेसिडंन्सी येथे छापा टाकुन चार जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ७८८ ग्रॅम ची उलटी जप्त केली. त्यांची किंमत ७० लाख रुपये एवढी आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांनी दिली. यातील तीन आरोपी हे गुजरात मधील असून एक आरोपी हा नालासोपारा येथील रहिवाशी आहे. ही उलटी कुठून आणली वकुणाला विकण्यासाठी आले याचा तपास सुरू आहे.

CS CamScanner

३) लोकसत्ता पृ. पान क्र. ३

दि. 06/12/2022

# पोलीस ठाण्यातून फरार आरोपी अटकेत

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** मांडवी पोलीस ठाण्यातून घरफोडी करणारा सराईत आरोपी फरार झालेल्या आरोपीला गुन्हे प्रकटीकरण शाखेने २४ तासांत अटक केली आहे.

घरफोडीच्या गुन्ह्यात मांडवी पोलिसांनी शनिवारी सराईत आरोपीला नालासोपारा पेल्हार येथून अटक केली होती. अब्दुल रहिमान ताहीर (२८) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या आरोपीला त्याच दिवशी मांडवी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी आणले त्या वेळी आरोपीने पोलिसांची नजर चुकवून पहिल्या मजल्यावरून उडी टाकून पोलीस ठाण्याच्या लगतच्या जंगलात पलायन केले होते. त्यानंतर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने पुन्हा शोधमोहीम सुरू करून कोपर परिसरातील जंगलातून २४ तासांच्या आत अब्दुल याला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक आरोपीकडून चोरीस गेलेले पाच मोबाइल असा सुमारे ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून काशिमीरा पोलीस ठाण्यातही गुन्हे दाखल आहेत. याचा अधिकचा तपास सुरू असल्याची माहिती परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली आहे. सदरची कारवाई मांडवी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ, सहायक पोलीस निरीक्षक संदीप सावंत, पोलीस उपनिरीक्षक राजेश सलगरे व त्यांच्या पथकाने केली आहे.

४) लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# वसईत १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी ५२७ उमेदवारी अर्ज

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** वसई तालुक्यात मुदत संपलेल्या १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका १८ डिसेंबरला पार पडणार आहेत. यासाठी सरपंच व सदस्य पदासाठी ५२७ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत.

यामध्ये वासळई, रानगाव, तरखड, खार्डी डोलीव, टेम्भी कोल्हापूर, टीवरी, खोचिवडे, टोकरे- खैरपाडा, पाणजू, पारोळ, तिल्हेर, करंजोन, नागले, मालजीपाडा आणि कळंब अशा ग्रामपंचायतींचा समावेश आहे. ५१ प्रभागांत १४१ जागांसाठी १८ डिसेंबरला या निवडणुका होणार आहे. यासाठी २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या दरम्यान इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. यामध्ये सरपंच पदासाठी ९१, तर सदस्य पदासाठी ४३६ असे एकूण ५२७ अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती नायब तहसीलदार चंद्रकांत पवार यांनी दिली आहे. तसेच सोमवारी या अर्जाची छाननी होऊन पुढील चिन्हवाटप यासह पुढील निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाणार आहे, असे तहसीलदार विभागाकडून सांगण्यात आले.

५) लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# पालघर जिल्ह्याच्या पारपत्र कार्यालयाचे आज उद्घाटन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई:** पालघर जिल्ह्याचे स्वतंत्र पारपत्र कार्यालय अखेर मंगळवार, ६ डिसेंबर रोजी सुरू केले जाणार आहे. हे कार्यालय तयार होऊन सहा महिने उलटले तरी सुरू केले नसल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने दिल्यानंतर यंत्रणा कामाला लागली आणि घाईघाईने ६ डिसेंबरचा मुहूर्त ठरविण्यात आला आहे.

जानेवारीमध्ये वसई पूर्वेच्या एव्हरशाइन सिटी येथील टपाल कार्यालयात या पारपत्र कार्यालयाचे निर्मितीचे काम सुरू करण्यात आले होते. दोन महिन्यांत हे पारपत्र जनतेसाठी खुले केले जाणार होते, मात्र नोव्हेंबर महिना संपत आला तरी ते सुरू करण्यात आलेले नव्हते. सर्व तयारी पूर्ण झालेली असताना पारपत्र कार्यालय सुरू होत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात येत होता.

राजकीय श्रेयासाठी या पारपत्र कार्यालयाच्या उद्घाटनाचे काम लांबणीवर टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात येत होता. याबाबतचे वृत्त 'लोकसत्ता' मध्ये शुक्रवारी प्रसिध्द करण्यात आले होते.

त्यानंतर शासकीय यंत्रणांची धावपळ सुरू झाली आणि मंगळवार, ६ डिसेंबर रोजी हे पारपत्र कार्यालय खासदार राजेंद्र गावित यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्याचे जाहीर करण्यात आले.

CamScanner

६) पूण्यनगरी पान क्र. १ (पुरवणी) दि. 06/12/2022

# चोरट्याला मारहाण करणाऱ्यांना अटक

**नालासोपारा :** पूर्वेकडील पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत चोरट्याला मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. याप्रकरणी पेल्हार पोलिसांनी चोरटा आदम याला मारहाण करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून ५ जणांना अटक केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील डहाणूकर वाडीत राहणारा आदम शेरे मोहम्मद खान हा २९ नोव्हेंबर रोजी एका ज्वेलर्सच्या मालकाची पत्नी घराला कुलूप लावून गेली असता आदम घराचे कुलूप तोडून आत चोरी करीत होता.

त्यादरम्यान ती परत आल्यावर घरात कोणीतरी चोरी करीत असल्याचे समजताच तिने आजूबाजूच्यांना बोलावून त्याला बाहेर येण्यास सांगितले. त्यावेळी तिथे जमलेल्या नागरिकांनी त्याला बेदम मारहाण केली आहे. आदम अट्टल गुन्हेगार असून, त्याचे भाऊ गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांनी कांदिवली पोलिसांवर हल्ला केला होता.

आदमविरोधात कांदिवली पोलीस ठाण्यात ११ गुन्हे दाखल असून, घरफोडी करणे, रॉबरी, दरोड्याची तयारी करणे असे ११ गुन्हे दाखल आहेत. तसेच पेल्हार पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी पेल्हार पोलिसांनी मारहाण करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून ५ जणांना अटक केली आहे.

७) पुढारी पान क्र. 5

# जंजिरे धारावी किल्ल्यात नशेबाजांची धरपकड

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात असलेल्या जंजिरे धारावी या किल्ल्यात नशेबाजी करणाऱ्यांसह दारू विक्री करणाऱ्या १३ जणांवर उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती व.पो निरीक्षक प्रशांत लांगी यांनी दिली.

नामशेष झालेल्या उत्तनच्या चौक परिसरातील जंजिरे धारावी किल्ल्याला नवसंजिवनी देण्यासाठी काही दुर्गप्रेमींनी प्रयत्न सुरु केले. त्याला काही लोकप्रतिनिधींसह पालिकेने प्रतिसाद देत संवर्धनासाठी यंदाच्या अंदाजपत्रकात तरतूद केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने देखील त्यासाठी सुमारे १ कोटीचा तर राज्य शासनाने १० कोटींचा निधी मंजूर केला आहे. जंजिरे धारावी किल्ल्याला नवसंजिवनी देण्यास सुरुवात झाली आहे. या किल्ला परिसरातील स्वच्छता पालिकेसह दुर्गप्रेमी करीत असताना काही असामाजिक तत्वांकडून त्यात दारूच्या बाटल्या व सिगारेची पाकिटे टाकली जात असल्याचे आढळून येऊ लागले आहे. दुर्गप्रेमी गणेश बामणे यांनी पालिकेसह उत्तन सागरी पोलिसांना पत्रव्यवहार केला. त्यावर उत्तन सागरी पोलिसांनी किल्ला परिसरात गांजा ओढणाऱ्या ६ तर दारू विकणाऱ्या ७ अशा १३ जणांवर नुकताच गुन्हा दाखल केल्याची माहिती दिली आहे.

८) पुढारी पान क्र. 5

# लॉजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**मिरारोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीतील एका लॉजींगमध्ये वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या लॉजचा मालक, मॅनेजर, वेटर अशा ६ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

इना पॅलेस (कॅपीटल) लॉजींगमध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांना पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी महिला पुरविल्या जातात. मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उप आयुक्तांच्या मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक टिळेकर व पथकाने शनिवारी सायंकाळी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन त्या लॉजमध्ये छापा मारला. हॉटेल इना पॅलेस येथील मॅनेजर व वेटर हे लॉजच्या माध्यमातून पिडीत महिलांशी संपर्क साधून त्यांना लॉजमध्ये बोलावून घेवून लॉजींगमध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांना पैशाच्या मोबादल्यात वेश्यागमनासाठी महिला पुरवित असल्याचे आढळून आले. त्यावेळी कारवाई दरम्यान ५ महिलांची सुटका करण्यात आली आहे. तसेच त्या लॉजचा मालक, मॅनेजर, वेटर अशा ६ आरोपींविरुध्द नवघर पोलीसांनी गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

CamScanner

९) पुढारी पान क्र.2

दि. 06/12/2022

# महाविकास आघाडीचा १७ डिसेंबरला मुंबईत मोर्चा

## राज्य सरकारविरोधात थोपटले दंड, महापुरुषांच्या अवमानाबद्दल विचारला जाब, कर्नाटकने महाराष्ट्राला डिवचल्याचाही निषेध

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांचा राज्यपालांकडून होणारा अवमान, महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळविणे, राज्यातील बेरोजगारी आणि महागाई विरोधात महाविकास आघाडीसह मित्रपक्षांनी राज्यातील भाजपा सरकारविरोधात अखेर दंड थोपटले आहेत. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडूनही महाराष्ट्राला खुले आव्हान दिले जाऊ लागल्यामुळे सत्ताधारी शांत बसत असल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने १७ डिसेंबर रोजी मुंबईत महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

राणीच्या बागेपासून सकाळी ११ वाजता हा मोर्चा आझाद मैदानाकडे निघणार आहे. विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या शासकीय निवासस्थानी सोमवारी आयोजित केलेल्या बैठकीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात आणि अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत याबाबत घोषणा केली.

या मोर्चाच्या तयारीसाठी ८ डिसेंबर रोजी आघाडीच्या नेत्यांची पुन्हा बैठक होईल.



**मुंबई :** महाविकास आघाडीतील नेत्यांची बैठक झाल्यानंतर पत्रकार परिषदेला उपस्थित असलेले खासदार संजय राऊत, आमदार आदित्य ठाकरे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विधान सभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे.

राज्यपालांना हटवण्याची मागणी महाविकास आघाडीने केली आहे. त्याआधी राज्यपालांना हटवले गेले तरी मोर्चा निघणारच, असे उद्धव ठाकरे यांनी ठणकावले.

विरोधी पक्षनेते पवार म्हणाले, राज्यपालानंतर आता सत्ताधारी पक्षाचे नेतेही छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करू लागले आहेत. त्यामुळे आधी राज्यपालांना बाजूला केले पाहिजे. देगलूर, जत, अक्कलकोट, नाशिकच्या भागातील गावे इतर राज्यांत जायचे आहे बोलत आहेत. आतापर्यंत कुठल्याही मुख्यमंत्र्यांच्या काळात अशी इच्छा व्यक्त केली नव्हती. आम्ही केलेल्या तरतुदीला या सरकारने स्थगिती दिल्यामुळेच सीमाभागातील गावांमध्ये अस्वस्थता आहे, अशी टीका पवार यांनी केली.

काँग्रेस नेते थोरात यांनी या सरकारबद्दल जनतेत असंतोष असल्याचा आरोप केला. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे. राज्यात सरकार आहे का, असा प्रश्न जनतेला पडला आहे. यांच्याकडून राज्याची अस्मिता जपली जात नसेल तर सत्ता सोडली पाहिजे यासाठी हा मोर्चा असल्याचेही थोरात यांनी सांगितले.

● उद्धव म्हणाले, राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यापासून महाराष्ट्रात फुटीरतेची बीजे पेरली जात आहेत. सीमाभागातील गावे कर्नाटक, गुजरात, तेलंगणात जायचे म्हणत आहेत. सांगली आणि सोलापूरमधील काही गावांवर दावा करणारे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे उद्या पंढरपूरचा विठोबा पण मागतील. राज्यात पूर्वी असे कधीही घडले नव्हते. शिवरायांचा महाराष्ट्र तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. कर्नाटक महाराष्ट्रातील गावांवर हक्क सांगत असताना आपले मुख्यमंत्री गप्प आहेत.यावरून राज्यात सरकार आहे की नाही, हा प्रश्न निर्माण झाला.

गुजरातची निवडणूक होती म्हणून महाराष्ट्रात येणारे उद्योग तिकडे पळवले. आता काही महिन्यात कर्नाटकची निवडणूक येणार आहे, त्यासाठी महाराष्ट्रातील गावे तिकडे पाठवणार का, असा सवाल करत असले नेभळट सरकार आपण कधी पाहिले नव्हते, असा टोला उद्धव यांनी लगावला.

CamScanner

दि. 06/12/2022

10) लोकमत पू. पान क्र. ५

# एटीएम कार्डची अदलाबदल करून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एटीएम मधून पैसे काढण्यास गेलेल्या रवींद्र परसराम यांची एका भामट्याने हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून परस्पर पैसे काढून फसवणूक केली.

रवींद्र हे शनिवारी भाईंदर पूर्वेच्या बंदरवाडी येथील ओस्वाल बिल्डिंगच्या एसबीआय बँकेच्या एटीएममध्ये गेले होते. कार्ड एटीएम मशीनमध्ये जात नसल्याने त्यांच्या मागे उभ्या असणाऱ्या एका अनोळखी तरुणाने मदत करतो सांगून त्यांचे कार्ड एटीएम मशीनमध्ये जोरात ढकलले. त्यानंतर पैसे निघाले, मात्र कार्ड मशीनमध्ये अडकून राहिले. बराच वेळ प्रयत्न करूनही कार्ड निघत नसल्याने रवींद्र लघुशंकेसाठी बाहेर आले. मशीनमध्ये अडकलेले कार्ड दुसरे असल्याचे तसेच त्यादरम्यान त्यांच्या कार्डद्वारे २८ हजार ५०० रुपये परस्पर काढून घेतल्याचे त्यांना कळले. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner